**पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**दिनांक 14/03/2020 (शनिवार)**
**(सकाळ)**

---

## चोरी

1) पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 15 कि.मी अंतरावर उकरवाही शिवार येथे दिनांक 11/03/2020 ते दिनांक 12/03/2020 चे 17.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– रोशन ज्ञानदेव भिवापुरकर, वय 35 वर्ष, रा. जोगीठाणा पेठ उमरेड यांचे बंद ओमपोल उदयोग कंपनीचे ऑफीसच्या दाराचा कोंडा अज्ञात आरोपीने तोडुन आत प्रवेश केला. यानंतर आरोपीने स्टोर रूम मधील 7 नग जुने लोंखडी चैनल पुल्ली कि. 40,000/–रू., 6 नग लोखंडी सब्बल कि. 3,000/–रू., कंपनी परीसरातील दोन ट्रेलरचे जुने 11 चक्के डिक्स सह कि. 1,10,000/–रू, कंपनी परीसरातील 45 नग जुने लोखंडी प्लेट कि. 25,000/–रू. असा एकुण 1,78,000/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 461, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार जयसिंगपुरे 9049175485 हे करीत आहे.

2) पो.स्टे. नरखेड :– अंतर्गत वार्ड क्र. 3 येथे दिनांक 13/03/2020 चे 09.00 वा. ते 18.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– यशोदा लक्षमनराव घाटोळे, वय 48 वर्ष, रा. वार्ड क्र. 03 नरखेड यांच्या घराच्या दाराचा कुलूप अज्ञात आरोपीने तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने फिर्यादीचे घरातील मधल्या रूम मधील लोखंडी पेटीमधील सोन्याचे दागिने किं. 10,000/–रू. व किचन रूम मधील गॅस ओटयाचे खाली डब्यामध्ये ठेवलेले 10,000/ रूपये रोख रक्कम असा एकुण 20,000/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम 454, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार मनोज गाढवे 8805405107 हे करीत आहे.

## दुखापत

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत मौजा गोंडी दिग्रस येथे फिर्यादी नामे– सौ. रूख्माबाई घनशाम तरारे, वय 50 वर्ष, रा. गोंडी दिग्रस यांचा घर आरोपी नामे– अक्षय तरारे, रा. गोंडी दिग्रस यांच्या घराला लागुन आहे. फिर्यादी हे दिनांक 13/3/2020 रोजी 18:00 वा. ते 18:30 वा. दरम्यान घरी हजर असतांना आरोपी हा मोटरसायकल घेवुन घरी आला व घराच्या समोरील नालीच्या फर्चीवर गाडी लावली. दरम्यान फिर्यादींचे पती नामे– घनशाम तरारे यांनी आरोपीस म्हटले की, ''तु नेहमी या जागेवर गाडी लावतो त्यामुळे फर्ची खचतो, तु यांनतर या जागेवर गाडी लावायची नाही.'' या कारणावरून आरोपीने फिर्यादीच्या पतीला शिविगाळ केली व गच्ची पकडुन तेथिल काठीने व दगडने मारहाण करून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 326, 504 भादवी कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. नमुद गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार राजेन्द्र वरोकर 9970449223 हे करीत आहेत.

## विनयभंग

पो.स्टे. कुही :– दिनांक 13/03/2020 चे 19.00 वा. दरम्यान 22 वर्षीय फिर्यादी/पीडित हिचा आरोपी नामे– प्रशांत उमाकांत वासनिक, वय 22 वर्ष, रा. मांढळ, आंबेडकर चौक, वार्ड क्र. 6 हा याने तिचा पाठलाग करून अश्लिल शब्दात बोलुन तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम 354(ड), 509 भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि तकीत 8766934595 या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर